## IESA - Resettlement and Rehabilitation Strategy

### पुनर्वसन  व पुर्ननिर्माण कार्यपध्दती

IESA परिक्षणाच्या वेळी प्रकल्प ज्या ठिकाणी राबवायचा आहे त्या ठिकाणी भूसंपादन अथवा भौतिक  विस्थापित करावी लागणार नाही असे आढळून आले आहे. ज्या ठिकाणी प्रकल्प करायचा आहे त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे मालकी हक्काबाबत संभाव्य अडथळे आढळून आले नाहीत. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण आढळून आले नाही. तथापी, भविष्यामध्ये भूसंपादनासाठी व प्रकल्पामधील पायाभूत सुविधा उभारण्यासाठी आवश्यक असणारी जागा संपादित करण्यासाठी निश्चित कार्यपध्दती तयार करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रकल्पाअंतर्गत संभाव्य पुर्नवसन व पुर्ननिर्माण संबंधी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सामाजिक व्यवस्थापन संरचना निर्माण करण्यात यावी. ESMF मध्ये नमूद केलेल्या चाळणी प्रक्रीयानुसार पुर्नवसन आराखडा (Resettlement Plan)  तयार करण्यात यावा.  पुर्नवसनाचा प्रकार,  प्रभाव व त्यावरील उपाय यावर हा आराखडा आधारभूत असेल. प्रकल्पामुळे झालेले विविध प्रकारचे नुकसान व प्रकल्पग्रस्त कुटूंबाना कशाप्रकारे मदत  करावी याची कार्यप्रणाली पुर्नवसनाच्या सरंचनेमध्ये नमूद करण्यात आली आहे. ही कार्यप्रणाली  महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व पुनर्वसन कायदा २००१ व प्रकल्पग्रस्त कुटूंबासाठी  पुनर्वसन व पुनर्निर्माण बाबतच्या राष्ट्रीय धोरण २००३ नुसार तयार करण्यात यावी. तसेच जागतिक बॅकेच्या मुंबई शहरी दळणवळण प्रकल्प व महाराष्ट्र राज्य जलस्वराज प्रकल्प यांच्या पुनर्वसन व पुर्नर्निर्माणाच्या अवलंबलेल्या कार्यपध्दतीच्या अनुभव आणि लाभार्थीच्या प्रतिसादाचा उपयोग या प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेले पुनर्वसन व पुर्ननिर्माण कार्यपध्दतीत करण्यात आलेला आहे.

### पुनर्वसन व पुर्ननिर्माण विषयी मार्गदर्शक तत्वे

खालील मार्गदर्शक तत्वानुसार प्रकल्पअंतर्गत पुर्नवसन व पुर्ननिर्माण केले जाईल.

१) स्थानिक लोकांच्या घरामधून अथवा व्यापारी जागेतून विस्तापित करण्यासाठी कोणताही उपप्रकल्प राबविला जाणार नाही.

२) या प्रकल्पाअंतर्गत कोणत्याही खाजगी जमिन भूसंपादित केली जाणार नाही परंतू तसे करावे लागल्यास सदर जागेच्या मूल्यांच्या बदल्यात नुकसान भरपाई देण्यात येईल.

३) प्रकल्पाच्या अंतर्गत अतिक्रमणे करणा-यांवर कारवाई करताना त्यांचे नुकसान झाल्यास त्यांना मदत करण्यात येईल.

४) प्रकल्पासाठी लागणा-या जमिनीसाठी खाजगी मालक व अतिक्रमणे असलेल्या लोकांना स्वखुशीने व ऐच्छिकपणे प्रकल्पासाठी जमिनी स्वाधीन करण्यासाठी प्रयत्न करावेत परंतू कोणत्याही प्रकारची जबरदस्ती यासाठी करण्यात येऊ नये.

५) प्रकल्प पुनर्वसन व पुर्ननिर्माण  विषयी आराखडा करताना, राबविताना आणि देखरेख करताना प्रकल्पग्रस्त कुटूंबाशी सल्लामसलत करण्यात येईल.

६) वित्त , भौतिक , मनुष्य बळ यासारखी पर्याप्त साधने या प्रकल्पाअंतर्गत होणा-या पुर्नवसन व पुर्ननिर्माण कार्यासाठी उपलब्ध करून दिली जातील.

७) प्रकल्पग्रस्त कुटूंबातील व्यक्तिंना या प्रकल्पा अंतर्गत रोजंदारीवरील कामासाठी प्राधान्य दिले जाईल.

८) सार्वजनिक मालमत्ता (धार्मिक बांधकामे , गायराने इ) साठी पर्यायी व्यवस्था केली जाईल अथवा सदरच्या लोक समुदायास योग्य नुकसान भरपाई दिली जाईल.

९) प्रकल्पाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये प्रत्येक उपप्रकल्पामुळे होऊ शकणा-या नुकसानाच्या परिणामाचे चाळणी प्रक्रीया केली जाईल. एखाद्या उपप्रकल्पामध्ये पुनर्वसन व पुर्ननिर्माण विषयी प्रश्न निर्माण झाल्यास त्यासाठी पुनर्वसन आराखडा प्रकल्पाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये तयार करण्यात येईल.

**प्रकल्प राबविण्याची मार्गदर्शक तत्वे**

स्वखूषीने स्वाधीन करण्यात येणारी जमिन - ज्या जमिन मालकांना स्वखूषीने अथवा देणगी स्वरूपात प्रकल्पासाठी देऊ केली असेल अशा जमिन मालकांच्या संमंतीपत्र घेणे. सदर संमंतीपत्रामध्ये जमिनीचे मालक, बाजार समितीचा अधिकृत प्रतिनिधी , ग्रामपंचायत सदस्य आणि महसूल विभागातील संबंधित अधिकारी यांच्या स्वाक्ष-या असाव्यात. सदर देऊ केलेल्या जमिनिमध्ये कोणत्याही प्रकारचे अडथळे असू नयेत. सदर व्यक्तिंना/संस्थाना प्रकल्पामध्ये प्राधान्याने लाभार्थी केले जाईल. सदर व्यक्तिंच्या /संस्थाच्या कोणत्याही तक्रारी बाजार समिती व ग्रामपंचायत पातळीवर सोडविण्यात याव्यात व तरी सुध्दा तक्रारी असल्यास म.रा.कृ.प.मंडळ, पुणे यांनी सोडवाव्यात.

**जमिनीसाठी द्यावी लागणारी नुकसान भरपाई**

ज्या ठिकाणी प्रकल्पासाठी खाजगी जमिनी घ्याव्या लागणार आहेत अशा ठिकाणी नुकसान भरपाईचे नियम सदर जमिन मालकाशी सल्लामसलत करून ठरविण्यात याव्यात. तसे न झाल्यास सदर जमिनीचे नुकसान भरपाई ही भूसंपादन कायदा १८९४ नुसार निश्चित करण्यात यावी. सदर ठरविलेले नुकसान भरपाई व पुनर्वसन मदत ही जागेच्या मूळ किंमती एवढी असावी. पर्यायी जमिन उपलब्ध करून दिल्यास जमिन मालकी हक्क हस्तांतरणासाठी येणारा खर्च नुकसान भरपाईतून वजा केला जाईल.

**वृक्ष व पिकांसाठी द्यावी लागणारी नुकसान भरपाई**

वृक्ष व पिकांसाठी देण्यात येणारी नुकसान भरपाई हि कृषी / उद्यान / वन विभाग यांनी ठरविलेल्या उत्पादकतेच्या आधारावर असेल.

प्रकल्पग्रस्त कुंटूंबासाठी पुनर्वसन व पुर्ननिर्माण मदतकार्य

प्रकल्पग्रस्त कुंटूंबांना नुकसान भरपाई व्यतिरिक्त खालील मदत केली जाईल.

१) व्यवसायासाठी (Income Generation Activity) उत्पादक अर्थसहाय्य (रू. २५०००/-)

२) गरजेप्रमाणे प्रशिक्षण आयोजित केले जाईल

३) आर्थिक वित्त सहाय्य व शासकीय योजना मिळण्यासाठी मदत केली जाईल.

४) प्रकल्पग्रस्तांना रोजंदारीवर प्रकल्पांअर्तगत सामावून घेण्यात येईल.

सदरचे मदतकार्य करताना प्रत्येक कुंटूबाला झालेले नुकसानाप्रमाणे  मदत केली जाईल व याचा उल्लेख खालील पुनर्वसन व पुर्ननिर्माण सरंचनेतील आर्थिक पुनर्वसनामध्ये  नमूद केले आहे.

### आर्थिक पुनर्वसनाचे लाभार्थी

प्रकल्पाच्या कामामुळे प्रकल्पग्रस्त कुंटूबांना होणा-या विविध प्रकारच्या नुकसानाच्या व परिणामांचे प्रमाणामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या संभाव्य आर्थिक पुनर्वसनाच्या हक्कांबाबत सरंचना केली आहे. या सरंचनेप्रमाणे प्रकल्पग्रस्त कुटूंबाना आर्थिक मदत करण्यात येईल व त्याव्दारे त्यांचे आर्थिकस्तर टिकविला जाईल.  सदर संरचना खालील तक्यात दिलेली आहे.

| नुकसानीचा प्रकार | प्रकल्पग्रस्तांचा प्रकार | प्रकल्पग्रस्तास मिळू शकणारी भरपाई |
|---|---|---|
| १)<br>अ) अधिकृत मालकी हक्क असलेली शेतजमिनच्या हक्कास मुकावे लागल्यास | मालकी हक्क असलेले कुंटूंब व वंशपरंपरागत अदिवासी | प्रकल्पग्रस्त कुंटूबाना खालीलपैकी एक पर्याय निवडावा लागेल.<br>**पर्याय १)** भूसंपादन अधिका-यांनी ठरविलेल्या पैश्याच्या स्वरूपात नुकसान भरपाई  + पर्यायी जमिन उपलब्ध करून दिल्यास ताबा घेण्यासाठीचा खर्च सरकारने ठरविलेल्या नियमाप्रमाणे केला जाईल. सदर जमिन हस्तांतर  MPAPR कायदा २००१ , विभाग ३ नुसार करण्यात येईल + नोंदणी शुल्क<br>**पर्याय २)** भूसंपादन अधिका-यांनी ठरविलेल्या पैश्याच्या स्वरूपात नुकसान भरपाई + पुनर्वसन अर्थसहाय्य हे कमीत कमी कृषी रोजंदारीवर खालीलप्रमाणे निर्धारीत असावेत<br>अ) ज्या कुटूंबाची संपूर्ण जमिन प्रकल्पासाठी गेल्यास ७५० दिवस रोजंदारी दिली जाईल.<br>ब) ज्या कुंटूबाच्या जमिनी प्रकल्पासाठी संपादीत केल्यामुळे ती कुंटूब अत्यल्प भूधारक झाले असल्यास त्यांना ५०० दिवस रोजंदारी दिली जाईल.<br>क) ज्या कुंटूबाच्या जमिनी प्रकल्पासाठी संपादीत केल्यामुळे ती कुंटूब अल्पभूधारक झाले असल्यास त्यांना ३७५ दिवस रोजंदारी दिली जाईल.<br>**पर्याय ३)**  भूसंपादन अधिका-यांनी ठरविलेल्या पैश्याच्या स्वरूपात नुकसान भरपाई + व्यवसायासाठी (Income Generation Activity) उत्पादक अर्थसहाय्य निश्चित उत्पन्न मिळण्यासाठी दिली जाईल. |
| ब) खंडकरी शेतकरी व करार / भाडे असलेले | कुंटूब | संपादीत केलेल्या जमिनीचे चालू भाडे/ करार असल्यास त्याची कराराच्या उर्वरीत कालावधीसाठी प्रतिपूर्ती करणे |
| क) अतिक्रमणे करणारी | कुंटूब | अतिक्रमण कुंटूब कुठल्याही नुकसान भरपाईस अपात्र राहतील. |

| | | |
|---|---|---|
| | | तरीसुध्दा ज्या दुर्बल घटकांतील कुंटूब जमिनी संपूर्ण संपादीत केल्या जातील अशी कुंटूबे व्यवसायासाठी (Income Generation Activity) उत्पादक अर्थसहाय्य निश्चित उत्पन्न मिळण्यासाठी पात्र ठरतील. |
| २) इतर स्थावर मालमत्तेच्या हक्कास मुकावे लागल्या | मालक | अधिका-यांनी ठरविलेल्या पैश्याच्या स्वरूपात नुकसान भरपाई दिली जाईल. |
| ३) सार्वजनिक मालमत्तेच्या हक्कास मुकावे लागल्यास | | |
| अ) ग्रामिण सार्वजनिक मालमत्ता | ग्रामस्थ / समाईक मालकी असलेला समाज | पर्यायी सामाजिक मालमत्ता वृध्दीगंत करून विकसित केली जाईल. |
| ब) सामाजिक सेवासुविधा | ग्रामस्थ / समाईक मालकी असलेला समाज | पर्यायी / समांतर सेवा सुविधा विकसित केली जाईल. |
| ४) वृक्ष व पिकांच्या हक्कास मुकावे लागल्यास | | |
| अ) मालकी हक्क | वहिवाटीत कुंटूब | अशा कुंटूबांना बाजार भावाप्रमाणे पिकांसाठी व फळ झाडांसाठी नुकसान भरपाई देण्यात येईल. |
| ब) खंडाने व करार / भाडे असलेली जमिन | | |

टिप - संदर्भासाठी Maharashtra Project Affected Persons Resettlement Act कायदा २००१ पहावा.

**प्रकल्पातील संस्थात्मक संरचना**

प्रकल्पाच्या प्राथमिक अवस्थेमध्ये प्रत्येक उपप्रकल्प संभाव्य नुकसानाच्या परिणामाचे दृष्टीकोनातून चाळणी प्रक्रीया केली जाईल. ही प्रक्रीया SC Form १ मध्ये दर्शविली आहे. या प्रकल्पाचा पुनर्वसन आराखडा बाबतचे मार्गदर्शन, देखरेख आणि राबविण्याची जबाबदारी पी.सी.यु मधील सामाजिक तज्ञांची राहील.

प्रकल्प राबविणारी संस्था ही उपप्रकल्प स्तरावर पुनर्वसन आराखडा तयार करण्यासाठी व त्याची अंमल बजावणी करण्यासाठी जबाबदार असेल. स्थानिक प्रकल्प पातळीवर ग्रामपंचायत / बाजार समिती हि पुनर्वसन आराखड्याबाबतच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी जबाबदार असेल.

IESA - Tribal Development Strategy

**अदिवासी विकासाबाबत प्रकल्पाची कार्यपध्दती**

या प्रकल्पामुळे जी आदिवासी कुंटूब प्रकल्पग्रस्त होतील व त्याचप्रमाणे या प्रकल्पाअंतर्गत या कुंटूबांचा कशा प्रकारे समावेश केला जाईल याचा अभ्यास करण्यात आला. प्रकल्प आराखडा करताना केलेल्या अशा अदिवासी कुंटूबाच्या गरजांचा विचार न केल्यामूळे तसेच सामाजिक व सांस्कृतिक फरक असल्यामूळे अदिवासी कुंटूबाचा अशा प्रकल्पामध्ये अत्यल्प समावेश दिसून आलेला आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये १/१० इतकी लोकसंख्या ही भटक्या विमुक्त जमातीची आहे. ही जमात पश्‍चिम घाटातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक व ठाणे जिल्हयामध्ये तसेच पूर्वेकडील चंद्रपूर , गडचिरोली , भंडारा, गोंदीया , नागपूर, अमरावती आणि यवतमाळ या वन जिल्हयामध्ये आढळते. या अभ्यास गटाला दर जमातीचे खालील प्रमुख मुद्दे / प्रश्न दिसून आले.

१) या जमाती पारंपारिक पध्दतीने शेती व्यवसाय करतात व कोणतेही आधुनिक उपकरणे / साधने याचा वापर न केल्यामुळे त्यांना शेती व्यवसायाचा जास्तीत जास्त फायदा होत नाही.

२) विकसित बाजार पेठांची अपुरी माहिती असल्युंळे व्यवसायात फायदा होत नाही.

३) वित्त सहाय्य, शेतीसाठी लागणारे आधुनिक बी-बीयाणे , सामुग्री साधने तसेच अपु-या कृषी विस्तार सेवा न मिळणे.

४) सक्षम नेतृत्वाचा अभाव, अपुरे प्रतिनिधीत्व व निर्णय क्षमतेचा अभाव असल्यामुळे

**प्रकल्पाची दिशा**

या प्रकल्पातून वरील सर्व प्रश्न सुटतील असे गृहीत धरू नये. तरी सुध्दा या प्रकल्पातून इतर प्रकल्पग्रस्त प्रमाणेच वरील जमातीचा जास्तीत जास्त फायदा होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात यावा. यासाठी योग्य दृष्टीकोन ज्या मध्ये माहिती , निर्णय क्षमता व कुशल प्रशिक्षण यांचा समावेश असेल. खालीलप्रमाणे आदिवासी/ भटक्या विमुक्त जमातीचा प्रकल्पामध्ये समावेश असण्याची कार्यपध्दती असावी.

| टप्पे | कार्यपध्दती | करावयाची कामे व साध्यता |
|---|---|---|
| पूर्वतयारी | लोक सहभागी मूल्यमापन PRA नुसार प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत प्रश्न / मुद्दे ठरविणे | प्रश्नाची / मुद्दयाची यादी करणे |
| | प्रकल्पाचे कार्यपध्दती व होणारे फायदे यांची माहिती अदिवासी व भटक्या विमुक्त जमातीशी सभा घेऊन देणे | जास्तीत जास्त सभा घेणे |
| | ठळक मुद्दे / प्रश्न कि जे प्रकल्पाव्दारे सोडविले जातील व आदिवासी विकासाचा | प्रश्न/ मुद्दयांची यादी तयार करणे<br>घेतलेल्या सभांची संख्या व इतिवृत्त तयार करणे |

| | | |
|---|---|---|
| | आराखडा तयार करणे | आदिवासी विकासासाठी करण्यात येणा-या कामांची यादी करणे |
| अंमलबजावणी | आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीचा देखरेखमधील समान सहभाग निश्चित करणे | देखरेख समितीमध्ये अदिवासी व भटक्या जमातीचा प्रतिनिधींचा सहभाग निश्चित करणे |
| | आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांना बांधकाम कामासाठी रोजगार देणे | जास्तीत जास्त आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांना रोजगार मिळेल |
| कार्यवाही | उत्पादक संस्थेच्या निर्णय समितीमध्ये आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या प्रतिनिधींचा समावेश निश्चित करणे | जास्तीत जास्त आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या सभासदांना कार्यकारी समितीमध्ये सहभाग मिळेल. |
| | आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांसाठी कार्यक्षमता व कुशल प्रशिक्षण | प्रशिक्षणाचे वेळापत्रक करणे ,<br>घेण्यात येणा-या प्रशिक्षणाची संख्या पाहणे आणि जास्तीत जास्त आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांसाठी प्रशिक्षण आयोजित करणे. जास्तीत जास्त प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे. |
| | उप प्रकल्पातील कामांमध्ये आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांना मिळालेला रोजगार | आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या जास्तीत जास्त महिलांना रोजगारा मिळणे. |
| | कुशलता व तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी शासकीय योजनांचा फायदा आदिवासी व भटक्या विमुक्त जमातीच्या विकासासाठी करणे | जास्तीत जास्त संलग्न शासकीय योजनाना जास्तीत जास्त जोडणे जाणे. |